पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय, भोसरी-३९.
जा.क्र.इक्षेका/४/कावि/ ५५२/२०१६
दिनांक - ०१ /०९/२०१६

**प्रति,**

**मा.----------------------------**
सदस्य/सदस्या
इ प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
भोसरी-३९.

**विषय- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दिनांक ७/९/२०१६ रोजी दुपारी ३.००वा. आयोजित केलेबाबत.**

**महोदय / महोदया,**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची मासिक सभा **बुधवार दिनांक ०७/०९/२०१६ रोजी दुपारी ३.०० वाजता** इ क्षेत्रीय कार्यालयाचे **"संत ज्ञानेश्वर महाराज"** सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू,

प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
इ प्रभाग समिती

प्रत- १. सर्व संबंधित शाखाप्रमुख

२. कार्यालयीन नोटीस बोर्ड

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

**इ प्रभाग समिती**
**कार्यपत्रिका क्रमांक – ०६**

दिनांक- **०७/ ०९/२०१६** रोजी वेळ- दुपारी ३.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची मासिक सभा **बुधवार दिनांक ०७/०९/२०१६ रोजी दु. ३.००** वाजता इ क्षेत्रीय कार्यालयातील **"संत ज्ञानेश्वर महाराज"** सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

अ) दिनांक ३/८/२०१६ रोजी झालेल्या सभेचा (कार्यक्रमपत्रिका ५) सभावृत्तांत कायम करणे.

विषय -१ नगररचना व विकास विभाग यांचे कडील क्र.नरवि/कावि /१६/१६०/२०१६दि.२९/०७/२०१६ चे पत्र, मौजे चौविसावाडी व आळंदी हद्दी वरील आळंदी क्षेत्रातील "संत ज्ञानेश्वर महाराज पादुका मंदीर हे पिंचिंमनपा पुणे-आळंदी ६०.००मी रस्त्याच्या आखणीच्या कक्षेत येत आहे. सद्यस्थितीत मौजे चौविसावाडी येथील पुणे-आळंदी ६०.०० मी रस्त्याचे भुसंपादनाचे काम विषेश भुसंपादन अधिकारी घटक क्र. १ यांचे मार्फत करणेत आले असुन भुसंपादनाचा निवाडा जाहिर करणेत आला आहे. सदर भूसंपादन निवाडयानुसार प्रत्यक्षात रस्ताविकासाच्या कामास सुरवात करणेत आली आहे. सदर रस्ता तिर्थ क्षेत्रविकास आराखडया मधील असल्यामुळे मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचे मार्फत रस्त्याचे कामाचे प्रगतीबाबत आढावा घेणेत येत असुन सदर तिर्थ क्षेत्र आराखडयातील रस्ते तातडीने वेळेत विकसित करणाच्या सुचना वारंवार देणेत येत आहेत. सदरचे मौजे चौविसावाडी येथील पुणे –आळंदी ६०.०० मी. रस्त्याचे भुसंपादन भागश: मंजूर विकास आराखडयानुसार करणेत आले असून पिंपरी चिंचवड हद्दीबाहेरील आळंदी हद्दीतील संत ज्ञानेश्वर महाराज पादुका मंदीर सदर पुणे-आळंदी ६०.०० मी रस्त्याच्या आखणी च्या कक्षेत येत असलयामुळे भूसंपादन अधिकारी यांचे मार्फत जाहीर निवाडयातील रस्त्याची आखणी कायम करणेत आली असून आळंदी नगर परिषद हद्दीतील आळंदीविकास आराखडयातील प्रस्तावित ४५.०० मी रस्ता तसेच ईपी नुसार ६०.०० मी रस्ता पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मंजूरविकास आराखडयातील ६०.०० मी रस्त्याला जूळवून घेऊन आखणी प्रस्तावित करणेत आली आहे. सदर सुधारीत प्रस्तावित आखणी नकाशानुसार स.नं. १०९ पैकी मध्ये रस्त्याचे पश्चिमेकडील बाजूची वळणामुळे वाढलेली मंजूर विकास योजना व जाहीर भूसंपादन निवाडया व्यतीरीक्त रस्त्याची जागा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस ताब्यात घ्यावी लागणार आहे. त्यामुळे सदर जागा प्रथम ताब्यात घेणेसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम २०५ अन्वये (म्युनिसिपल रोड) रस्ता घोषीत करणे आवश्यक आहे. तरी सदर मान्य आखणी प्रस्तावानुसार सोबतचे मौजे चौविसावाडी येथील स.नं.१०९ मिळकती मधील महाराष्ट्र मनपा अधिनियमचे कलम २०५ अंतर्गत रस्ता घोषित करणे बाबत विचार करणे.

विषय क्र.२- मा. सुनिता (माई) पांडूरंग गवळी यांचे दि.३१/०८/२०१६ चे पत्र, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या भोसरी येथील भोसरी बस टर्मिनलला कै.ह.भ.प.ज्ञानेश्वर लोंढे (भोसरीकर माऊली )असे नामकरण करणेबाबतचा ठराव झालेला आहे भोसरी येथील प्रभाग क्र.३४ गव्हाणे वस्ती स्कायवॉक ब्रिजला कै.ह.भ.प.वै.गुरुवर्य भोसरीकर माऊली तथा ज्ञानोबा भिमाजी लोंढे पादचारी पुल असे नाव दिलेले आहे. तरी भोसरी बस टर्मिनलला दिलेले नाव बदलून स्वर्गवासी ज्ञानेश्वर (माऊली दादा) सोपान गवळी यांचे नाव देणेबाबत विचार करणे.

-------

मा.सभापती यांचे मान्यतेने ऐनवेळचे विषय घेणे.

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा
इ क्षेत्रीय कार्यालय
भोसरी – ३९.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय, भोसरी-३९
जा.क्र.इक्षेका/४/कावि/५५२/२०१६
दिनांक -०१/०९ /२०१६